लोकमत Hello पुणे



मुकुल माधव फाउंडेशनतर्फे केईएम रुग्णालयातील एनआयसीयूमध्ये 'सोनाली-द लिटल स्टार्स रूम' या नावाने सुरू करण्यात आलेल्या विशेष कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी (डावीकडून) रितू छाब्रिया, मनीषा जैठा, आशा जैठा, मनीष जैठा व गायत्री छाब्रिया.

# मुकुल माधव फाउंडेशनतर्फे केईएम रुग्णालयातील एनआयसीयूमध्ये विशेष कक्ष

पुणे | दि. २९ (प्रतिनिधी)

**मुकुल** माधव फाउंडेशनतर्फे केईएम रुग्णालयातील नवजात अतिदक्षता वॉर्डमध्ये (एनआयसीयू) विशेष कक्ष सुरू करण्यात आला आहे. 'सोनाली-द लिटल स्टार्स रूम' असे नामकरण करण्यात आलेल्या या कक्षाचे उद्घाटन स्पायका इलास्टीक कंपनीचे संचालक रजनीकांत जैठा व त्यांच्या पत्नी आशा जैठा यांच्या हस्ते झाले.

या वेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनचे संस्थापक प्रल्हाद छाब्रिया, फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, गायत्री छाब्रिया, केईएम रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. के. जे. कोयाजी, बालतज्ज्ञ विभागाचे प्रमुख डॉ. ए. एन. पंडित, मनीष जैठा, मनीषा जैठा उपस्थित होते.

या नव्या कक्षात ६ बेड असून, एक व्हेंटिलेटर, बबल, सीपीएपी, पल्स ऑक्झिमीटर, फोटोथेरपी युनिट, सिरिंज पंप, वॉर्मर यांचा समावेश आहे. ज्या कुटुंबाची आर्थिक स्थिती हालाखिची आहे त्यांच्या नवजात अर्भकांना येथे सुविधा मिळणार आहे.

प्रकाश छाब्रिया म्हणाले, केईएम रुग्णालय गरीब व गरजू लोकांसाठी कार्यरत आहे. लहान मुलांच्या विकासासाठी मुकुल माधव फाउंडेशन नेहमीच योगदान करीत आले आहे आणि पुढेही करेल. सोनाली हे माझ्या बहिणीचे नाव आहे. तिचे लहानपणीच निधन झाले आहे. त्यामुळे तिच्या नावाने हा कक्ष सुरू करण्यात आला आहे.